पत्र.....

क्र.कृआआ-२०१९/सुसियो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.०५/ ८१६ /फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दिनांक - १६ नोव्हेंबर,२०१९

प्रति,

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी(सर्व)**

**विषय : प्रधान मंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत(PMKSY)केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी सुचना निर्गमित करणेबाबत...**

**संदर्भ :** कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआआ-२०१९/सुसियो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.०५/६५१,दि.११ सप्टेंबर,२०१९

उपरोक्त संदर्भिय पत्राव्दारे सन २०१९-२० व पुढील कालावधीमध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत (PMKSY) प्रति थेंब अधिक पिक सुक्ष्म सिंचन या घटकाच्या अंमलबजावणीसाठीच्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत सुचनाबाबत क्षेत्रिय अधिकारी, सुक्ष्म सिंचन संच उत्पादक व त्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडून काही अडचणी मांडण्यात आलेल्या आहेत, सदर अडचणी / सुचना विचारात घेवून खालील प्रमाणे कळवण्यात येत आहे.

१) संदर्भिय पत्राव्दारे निर्गमित सुचनामधिल परिच्छेद १.३.९(क) व ५.४ एकसमान आहेत. त्यामुळे १.३.९(क) हा ५.४ प्रमाणे वाचावा.

२) मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतील **सुक्ष्म सिंचन** घटकांतर्गत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना देय ५५% अनुदानास २५% पुरक अनुदान देवून ८०% अनुदान देणेसाठी व इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) देय ४५% अनुदानास ३०% पुरक अनुदान देवून ७५% अनुदान देय आहे. मात्र,योजनेतील समाविष्ठ तालुक्याबाबत क्षेत्रियस्तरावर संभ्रम असल्याचे दिसुन येतो.

त्यामुळे योजना अंमलबजावणी सुचनातील परिच्छेद १.३.२२(क) बाबत स्पष्ट करण्यात येते की, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत देय पुरक अनुदानासाठी विदर्भ व मराठवाडयातील १९ जिल्हयातील सर्व तालुक्यांचा समावेश राहील. तसेच, विदर्भ व मराठवाडयातील जिल्हे व त्याअंतर्गत येणाऱ्या तालुक्याव्यतिरिक्त अवर्षणप्रवण घोषित १४९ तालुक्यापैकी(परिशिष्ट-१३) **नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा व सांगली** या जिल्हयातील अवर्षणप्रवण घोषित ७० तालुक्यांचा समावेश राहील.

३) प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पिक - सुक्ष्म सिंचन घटकांतर्गत सन २०१९-२० साठी शेतकऱ्यांकडून ऑन लाईन प्रणालीव्दारे अर्ज स्विकारण्यासाठी ई-ठिबक अज्ञावली दि.०१/०६/२०१९ पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे दि.०१/०६/२०१९ पासून अर्ज केलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांचे बाबत सर्व बाबी ग्राहय धरुन मार्गदर्शक सुचनेप्रमाणे अनुदान अदायगीची कार्यवाही करावी.

४) वितरक नोंदणीसंदर्भात काही जि.अ.कृ.अ. मार्फत आयुक्तालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनाव्यतिरिक्त काही कागदपत्रांची त्यांचेस्तरावर मागणी केली जाते किंवा जास्तीच्या सुचना निर्गमित केल्या जातात. त्यामुळे क्षेत्रियस्तरावर अंमलबजावणीमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण होते. कृषि आयुक्तालयाच्या पुर्वपरवानगीशिवाय स्थानिकस्तरावर कोणत्याही अतिरिक्त सुचना निर्गमित करण्यात येवू नयेत.

५) सन २०१९-२० मध्ये सुक्ष्म सिंचन योजनेची अंमलबजावणी ई-ठिबक अज्ञावलीवर अर्जप्रक्रिया सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांनी संच घेवून केलेली आहे. कंपनी / वितरकांनी तत्कालीन दराने शेतकऱ्यांना बील इन्व्हाईस(Invoice) दिलेले आहे. तथापी सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांनी नोंदणी / नुतनीकरणानंतर सुक्ष्म सिंचन साहित्याचे ई-ठिबक प्रणालीवर सन २०१९-२० साठीचे दर भरलेले असून, त्यास आयुक्तालयाने सहमती(Approval) दिलेली आहे. या कालावधीत काही कंपन्यांचे दर मुळ इनव्हाईस (Invoice) पेक्षा कमी झालेले आहेत. तेंव्हा अनुदानाची परिगणना करतांना कंपनीला सहमती (Approval) दिलेल्या दराप्रमाणे करण्यात यावी. म्हणजेच मुळ इनव्हाईस (Invoice)ग्राहय धरावे तथापी परिगणना कमी झालेल्या (Approval)दराने करावी.

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५

**प्रत - विभागीय कृषि सहसंचालक(सर्व) यांना माहितीस्तव व पुढील योग्य कार्यवाहीस्तव**